जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४२१ दिनांक - ०४/१०/२०२४**

हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## शेअर मार्केट मध्ये जास्त परताव्याच्या आमिशाने फसवणा-या ठगास घेतले ताब्यात

फिर्यादी यांना शेअर मार्केट शिकण्याची आवड होती. त्यासाठी ते **Value trade share market** व **Trade Art share market** हिंगणे कॅपीटल,फ्लॅट नं. १०१, ससाणेनगर, रामटेकडी रोड, हडपसर येथे गेले. तेथील क्लासचे संचालक प्रतिक कुमार चौखंडे यांनी फिर्यादीस शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविल्यास, गुंतविलेल्या पैशावर चांगला परतावा हा दर महिन्याला देईन. सदर परतावा हा १० टक्केने देण्यात येईल असेही सांगितले. फिर्यादी यांनी प्रतिक कुमार चौखंडे यांचेकडे शेअर मार्केटमध्ये २५,००,०००/- रु. गुंतविले व त्याबाबतचा करारनामा केला. ऑगस्ट २०२४ पासून प्रतिक कुमार चौखंडे यांनी परतावा देण्याचे बंद केले. नंतर प्रतिक चौखंडे यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी फोन उचलला नाही. अधिक माहीती घेता फिर्यादी यांचेप्रमाणेच इतर ४३ गुंतवणूकदार यांची प्रतिक चौखंडे यांनी फसवणुक केल्याचे फिर्यादी यांचे लक्षात आले. फिर्यादी व अन्य गुंतवणूकदार असे मिळून एकुण ०५,९६,२१,०००/- रू इतक्या मोठ्या रक्कमेची आर्थिक फसवणुक केल्याने हडपसर पोलीस ठाणेस गु.र.नं. १५३७/२०२४, भा.द.वि. कलम ४०६,४०९,४२० सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हित संबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (एमपीआयडी) कलम ३ गुन्हा करण्यात आला.

सदरचा आरोपी हा फरार झाला होता. हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष पांढरे यांना मिळालेल्या बातमीवरून आरोपी **प्रतिक कुमार चौखंडे वय ३६ रा. स्वप्नलोक सोसायटी पापडे वस्ती फुरसुंगी पुणे** यास ताब्यात घेतले. त्याचेकडे चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी यास पुढील तपासकामी आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. दाखल गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री. मनोज पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ पुणे श्री. आर राजा, यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, श्रीमती अश्विनी राख, हडपसर पोलीस स्टेशन, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष पांढरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री. निलेश जगदाळे, यांचे सुचनांप्रमाणे तपास पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे, पोलीस उप निरीक्षक महेश कवळे,यांनी केली आहे.


हडपसर